# BY THE COLLECTOR OF MUMBAI CITY DISTRICT

## Notification

**RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013**

No.C/ACQ/Mum.city/CR.2/LAQ/SR/2018 C.S.No.956 Bhuleshwar Division Whereas, under the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) (hereinafter referred to as the "said Act") preliminary notification under section 11 sub-section (1) No. No.C/ACQ/Mum.city/CR.2/LAQ/SR/2018 C.S.No.956 Bhuleshwar Division, dated 17th January 2019 was published in Maharashtra Government Gazette dated 24-30 January 2019 (K.D.S) on page no. 28-29 (hereinafter referred to as the "said Notification") and published in daily News paper "Sakal" on 20/01/2019 and "Hindustan Times" on 20/01/2019 notifying that the land premises described in the Schedule here to (hereinafter referred to as the "said land") was needed or likely to be needed for the public purpose specified in the Schedule thereto (hereinafter referred to as the "said purpose");

2. Whereas, the said land is needed for the infrastructure project and therefore as per the Amendment to the said Act published in Maharashtra government gazette dated 26th April 2018 is exempted from the application of the provisions of the chapter II and III (section 4-10) of the said Act and whereas due to application of section 40 pertaining to urgency clause to the above acquisition proceedings vide the said Notification provisions of chapter IV shall not apply, therefore enquiry under section 15 has not been carried out.

3. Whereas, the Acquiring Body that is Mumbai Metro Rail Corporation Limited (hereinafter referred to as "MMRCL") has informed vide its letter no.MMRCL/R&R/Gi.Ka./51/2019 dated 11/02/2019 that It is going to resettle and rehabilitate Project Affected Persons as certified by MHADA after survey permanently as per the In-Situ Rehabilitation Policy. Some of the tenants have written to this office on 14th and 15th March 2019 that they are considering transfer of their rights in favour of Owner on mutually acceptable commercial terms. In any case, if the tenants and owners are to be rehabilitated and resettled, then as per Acquiring Body's Rehabilitation policy till they are finally resettled there are two alternatives available for temporary rehabilitation to tenants and owners namely rent or residential tenement at Pimpalwadi. Other than permanent rehabilitation provision for project affected persons following allowances/rents are also provided for temporary rehabilitation:

1. Eleven month's advance payment of rent for project affected persons to hire residential/commercial premises
2. one month's advance rent towards agency charges
3. Provision of shifting allowance for temporary rehabilitation Rs 25,000/- and for permanent rehabilitation Rs 25,000/ that is in total Rs 50,000/ towards shifting will be disbursed in 2 stages.
4. Provision for 10% rise per year in the rent.
5. Provision for maintenance of Pimpalwadi residential complex provided as temporary rehabilitation by MMRCL so as not to burden project affected persons.
6. This Rehabilitation and Resettlement policy is available on MMRCL's website www.mmrcl.com

4. And Whereas, Collector of Mumbai City is satisfied that CS No. 956 of Bhuleshwar Division admeasuring 119.57 sq.mts. is required for the said purpose

5 Therefore, in exercise of the delegated powers under subsection (1) of section 19 of the said Act, The Collector of Mumbai City hereby declares that the said land is needed for the said purpose and under clause (g) of section 3 of the said Act the Collector being the Appropriate Government is pleased to designate Deputy Collector Land Acquisition, Mumbai City, D.D. Building, First Floor, Old Custom House, Fort, Mumbai, 400001 to perform the functions of Collector under the said Act. The Project report/ Plan of the said land is available in the office of the Deputy Collector Land Acquisition, Mumbai City during office hours.

**Schedule**
**Description of Land**
**District Mumbai City**

| Sr. No. | Division | C.S.No. | Area in Sq. Mtrs. |
|---|---|---|---|
| 1 | Bhuleshwar | 956 | 119.57 |

Public Purpose: Acquisition for the purpose of Mumbai Metro Line-3

Shivaji Jondhale,
Collector Mumbai City

Please: Mumbai City
Date: 25/03/2019

## जिल्हाधिकारी, मुंबई शहर

## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३**

क्रमांक-जि/भूसं/मु.श/प्र.क्र.२/एलएक्यू/एसआर-२०१८/भूकर क्र.९५६ भुलेश्वर विभाग- भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ ( २०१३ चा ३० ) (या यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) च्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकरांचा वापर करुन क्रमांक- जि/भूसं/मु.श/प्र.क्र.२/एलएक्यू/एसआर-२०१८/भूकर क्र.९५६ भुलेश्वर विभाग दिनांक १७ जानेवारी २०१८ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली असून ती अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक (को.वि.पु)-४ अ दिनांक २४-३० जानेवारी २०१९ रोजीचे पृष्ठ क्रमांक २७ वर प्रसिध्द झाली आहे. तसेच दैनिक वृत्तपत्र "सकाळ" या मध्ये दिनांक २०/०१/२०१९ व दैनिक वृत्तपत्र "हिंदूस्तान टाईम्स यामध्ये दिनांक २०/०१/२०१९ रोजी प्रसिध्द झाली आहे. त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अनुसुचीतील जमीनीची अनुसुचीमध्ये (जमीनीचे वर्णन) अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा निर्देश "उक्त प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

**२.** ज्या अर्थी, सदर भूसंपादन प्रस्तावातील मिळकत ही उक्त सार्वजनिक प्रयोजनार्थ पायाभूत सुविधासाठी संपादन करण्यात येत असल्याने सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २६ एप्रिल २०१८ मधील कलम १० (क) अन्वये उक्त अधिनियम, प्रकरण क्रमांक २ व ३ मधील (कलम ४ ते १०) तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे. तसेच सदर भूसंपादन प्रकरणी तातडीचे कलम ४० उपरोक्त अधिसूचनेव्दारे लागू करण्यात आले असल्याने प्रकरण ४ च्या तरतूदी लागू होणार नाहीत, त्यामुळे कलम १५ खालील चौकशी करण्यात आलेली नाही.

**३.** ज्या अर्थी, उपरोक्त प्रकल्पाचे संपादन संस्था मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसना करीता तयार करण्यात आलेल्या धोरणानुसार पुनर्वसन करणार आहेत व त्याकरीता या संपादनाखालील क्षेत्रावरील इमारत उपकर प्राप्त इमारत असल्याने म्हाडामार्फत सर्वेक्षण करुन प्रमाणित पात्रता यादीनुसार पात्र रहिवासी/भाडेकरुन/गाळेधारक यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन याच ठिकाणी करण्यात येईल असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, यांनी त्यांचेकडील क्र. मुं.मे.रे.कॉ.लि./पुवपु/गि.का/५१/२०१९ दिनांक ११/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. भाडेकरुपैंकी काही भाडेकरुनी त्यांचे अधिकार मालकाच्या लाभात परस्पर स्वीकार्य अश्या अटींवर हस्तांतरीत करण्याचे विचाराधीन असल्याचे दिनांक १४/०३/२०१९ व १५/०३/२०१९ रोजी लिहून दिले आहे. तथापी तसे न झाल्यास सदरचे पुनर्वसन धोरणानुसार कायमस्वरुपी पुनर्वसन होईपर्यंत प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या तात्पुरत्या पुनर्वसनाकरीता दोन पर्याय असून, भाडे अथवा पिंपळवाडी येथे निवासी सदनिका उपलब्ध करण्यात येईल असे नमूद आहे. प्रकल्पग्रस्तांच्या कायम पुनर्वसन आराखड्याशिवाय त्यांच्या तात्पुरत्या पुनर्वसनासाठी खालीलप्रमाणे मोबदला देखील देण्यात येणार आहे.

१. प्रकल्पग्रस्तांना तात्पुरत्या स्वरुपात निवासी सदनिका/व्यावसायिक गाळे भाडेतत्वावर घेणेकरिता प्रतिवर्षी ११ महिन्याचे भाडे आगाऊ स्वरुपात देण्याची तरतूद करण्यात आली आहे.
२. एजन्सी चार्जेस म्हणून एक महिन्याचे भाडे आगाऊ देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

३. स्थंलातरण भत्ता (तात्पुरत्या पुनर्वसनावेळी रक्कम रुपये २५,०००/- व कायमस्वरुपी पुनर्वसनावेळी रक्कम रुपये २५,०००/- अशाप्रकारे स्थंलातरण करणेसाठी एकूण रक्कम रुपये ५०,०००/- ) दोन टप्प्यांमध्ये वितरीत करण्यात येणार आहे.
४. देण्यात येणाऱ्या भाड्यामध्ये प्रतिवर्षी १०% वाढ देण्यात येणार आहे.
५. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मार्फत तात्पुरत्या पुनर्वसनाकरीता देण्यात येणाऱ्या पिंपळवाडी येथील निवासी सदनिकांची देखभाल दुरुस्ती (Maintenance) देखील करण्यात येणार असून सदर बोजा प्रकल्पग्रस्तांवर टाकला जाणार नाही.
६. सदर पुनर्वसन धोरण संपादन संस्था मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, यांचे संकेतस्थळ www.mmrcl.com वर उपलब्ध आहे.

४. ज्याअर्थी, विभाग भुलेश्वर येथील भूकर क्र. ९५६ क्षेत्रफळ ११९.५७ चौ.मी. या जमीन उक्त सार्वजनिक प्रयोनासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांची खात्री झाली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाचे कलम १९ च्या पोट कलम (१) तरतुदीनुसार उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे;

५. त्याअर्थी, शासनाने प्रदान केलेल्या शक्तीनुसार आणि उक्त अधिनियम २०१३ च्या कलम १९ च्या पोट कलम (१) अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर असे घोषित करतात की परीच्छेद क्र.३ मधील नमुद विभाग भुलेश्वर येथील भूकर क्र. ९५६ क्षेत्रफळ ११९.५७ चौ.मी. क्षेत्र मुंबई मेट्रो लाईन-३ प्रकल्पाच्या बांधकामासाठी आवश्यक आहे आणि उक्त अधिनियम,२०१३ च्या कलम (३) खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मुंबई शहर डी.डी.इमारत, पहिला मजला जुने जकात घर, फोर्ट, मुंबई-४०० ००१ यांना पदनिर्देशित करीत आहे. संपादनाखालील जमिनीचा प्रकल्प आराखडा/नकाशा पाहण्यासाठी उपरोक्त ठिकाणी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

**अनुसूची**

**जमिनीचे वर्णन**

**जिल्हा मुंबई शहर**

| **अ.क्र.** | **विभाग** | **भूकर क्रमांक** | **संपादनाखालील जमिनीचे क्षेत्र चौ.मी** |
|---|---|---|---|
| १ | भूलेश्वर | ९५६ | ११९.५७ |

**सार्वजनिक प्रयोजन:-** मुंबई मेट्रो लाईन- ३ प्रकल्पाच्या बांधकामासाठी

ठिकाण:-मुंबई शहर

दिनांक :- २५/०३/२०१८

शिवाजी जोंधळे,
जिल्हाधिकारी, मुंबई शहर